राज्यातील शासकीय/शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या कौटुंबीक उत्पन्न गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील एमबीबीएस आणि बीडीएस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिक्षण शुल्काची ५०% प्रतिपुर्ती करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१८/प्र.क्र.४९/१८/शिक्षण-२

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

दिनांक : १७ एप्रिल, २०१८.

संदर्भ

१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/ प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३.१०.२०१६
२. शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/ १६/ शिक्षण-२, दिनांक ०९.१२.२०१६
३. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५.०४.२०१७
४. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ०७.१०.२०१७

प्रस्तावना:-

उपरोक्त “वाचा” येथील शासन निर्णय क्रमांक १ अन्वये मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्यादुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत लाभ देण्याकरीता पात्रतेसाठी कुटुंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा रु.६.०० लाख करण्यात आली असुन राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेची व्याप्ती वाढवुन सदर योजनेचे नामकरण “राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना” असे करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसंदर्भात उपरोक्त “वाचा” येथील शासननिर्णय क्रमांक २ अन्वये पुरक आदेश निर्गमित करण्यात आल आहेत.

राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील एमबीबीएस आणि बीडीएस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क महाविद्यालयास अदा करण्याकरीता राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडुन शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम (राष्ट्रीयकृत बँकेकडुन देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम) ही अनुदान स्वरुपात अदा करण्यास राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेंतर्गत उपरोक्त "वाचा" येथील शासननिर्णय क्रमांक १ आणि २ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचे नामकरण उपरोक्त "वाचा" येथील शासननिर्णय क्रमांक ३ अन्वये "राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" असे करण्यात आले आहे. संदर्भाधीन शासननिर्णय क्रमांक ४ अन्वये "राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील एमबीबीएस आणि बीडीएस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क अदा करण्याकरीता घेतलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाऐवजी इतर अभ्यासक्रमांप्रमाणे ५० टक्के शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती देण्याबाबत मराठा क्रांती मोर्चाच्या विविध मागण्यांबाबत निर्णय घेण्याकरीता शासनाव्दारा स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक १४.०२.२०१८ रोजीच्या आढावा बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

१. राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील एमबीबीएस आणि बीडीएस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञानाच्या इतर व्यावसायीक पदवी अभ्यासक्रमांप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत त्यांच्या शिक्षण शुल्काच्या रकमेची ५०% शिष्यवृत्ती अदा करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे. सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाची रक्कम अनुदान म्हणुन यापुढे अदा करण्यात येणार नाही. या अनुषंगाने उपरोक्त "वाचा" येथील शासननिर्णय क्रमांक १ आणि २ मध्ये विवक्षित बदल गृहीत धरुन कार्यवाही करावी.

२. वरिलप्रमाणे एमबीबीएस/ बीडीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ५०% शिष्यवृत्ती ही सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन लागु होईल. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेशित होणाऱ्या सर्व पात्र

विद्यार्थ्यांना उक्त योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. तथापि, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापुर्वी एमबीबीएस/बीडीएस अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना सदर लाभ हा सन २०१८-१९ पासुनच अनुज्ञेय होईल. सदर सुधारणा वगळता राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिष्यवृत्ती योजना ही पुर्वीप्रमाणेच राबविण्यात येईल.

३. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिष्यवृत्ती योजनेसंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन आदेशाची अंमलबजावणी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय हा मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेने व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ११२/२०१८/व्यय-१३, दिनांक ०१.०३.२०१८ अन्वये प्राप्त त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201804171720182513 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2018.04.17 18:04:17 +05'30'

(सुरेन्द्र प्र.चानकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, महसूल तथा अध्यक्ष, मंत्रीमंडळ उपसमिती यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई.
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विजाभज इमाव व विमाप्र, पुणे.
संचालक, आरोग्य सेवा संचालनाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सह/ उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका).
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/ प्राचार्य सर्व शासकीय/ महानगरपालिका/ अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये.
निवडनस्ती (शिक्षण-२).